दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे
बीड/महाराष्ट्र | सोमवार दि.१० मार्च २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१३४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## शक्तीपीठ महामार्गविरोधात बुधवारी विधानभवनावर धडक

**मुंबई**–शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्ग कदापि होऊ देणार नाही असा एल्गार पुकारत येत्या बुधवारी अधिवेशन काळात मुंबईतील विधानभवनावर १२ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे समनव्यक गिरीश फोंडे यांनी रविवारी दिली. आझाद मैदानात सकाळी ९ वाजता या मोर्चाला सुरुवात होईल. राज्यभरातून या मोर्चाला दहा हजारांहून अधिक शेतकरी येणार असून कोल्हापूर जिल्ह्यातील चार हजार शेतकरी या मोर्चात सहभागी होणार आहेत. काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे. १२ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गाला एक इंचही जमीन देणार नसल्याची शपथ घेत कोल्हापुरातून एल्गार पुकारला होता.कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, सिंधुदुर्ग, बीड, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच या महामार्गाला विरोध दर्शिवला होता.या महामार्गाविरोधात कोल्हापुरातून वात लागल्याने सत्ताधारी हादरले आहेत.

# भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव

## रोहित शर्माने रचला इतिहास; न्यूझीलंडवर मिळवला ऐतिहासिक विजय

**दुबई (वृत्तसंस्था):** भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भारताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये आता इतिहास रचला आहे. आतापर्यंत जी गोष्ट रोहित शर्माला कधीच करता आली नव्हती, ती रोहित शर्माने या सामन्यात करून दाखवली आहे.रोहित शर्मा हा चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पुरता अपयशी ठरला आहे, त्याचे पोटपुढे आले आहे, तो फिट नाही, अशी टीका त्याच्यावर होत होती. पण या टीकेला रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये चोख उत्तर दिल्याचे पाहायला मिळाले. रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये अशी देदिप्यमान कामगिरी केली की, सर्व टीकाकारांची तोंडं त्याने एकाच सामन्यात बंद करून दाखवली.रोहित शर्मा आतापर्यंतच्या चाही सामन्यात धडाकेबाज सुरुवात करत होता, पण त्यानंतर तो लवकर बाद होत होता. रोहित शर्माला या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये लौकिकाला साजेशी खेळी करता आली नव्हती. पण फायनलमध्ये रोहित शर्माने मात्र तुफानी फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना आपल्यापुढे लोटांगण घालायला भाग पाडले आणि त्याने आपला फॉर्म कसा मोक्याच्या वेळी येऊ शकतो, हे दाखवून दिले. रोहित शर्माने फायनलच्या सामन्यात अशी दणकेबाज सुरुवात केली की, त्याची तोड न्यूझीलंडच्या गोलंदाजांकडे नव्हती. त्यानंतर रोहित शर्माने या चॅम्पियन्स ट्रॉफीत स्पर्धेतील पहिले अर्धशतक झळकावले. पण त्याचबरोबर एक माहिती अशी समोर आली आहे की, रोहित शर्माला यापूर्वी अशी कामगिरी कधीच करता आली नव्हती. आतापर्यंत रोहित शर्मा ज्या आयसीसीच्या फायनलमध्ये खेळला आहे, त्या कोणत्याही फायनल मॅचमध्ये रोहित शर्माला अर्धशतक झळकावता आलेले नव्हते. पण या सामन्यात प्रथमच रोहित शर्माने आयसीसीच्या फायनलमध्ये अर्धशतक झळकावल्याचे पाहायला मिळाले आणि त्याने इतिहास रचला. कारण यापूर्वी अशी कामगिरी रोहितला कधीच करता आली नव्हती, जी रोहितने यावेळी करून दाखवली आहे.




## रियाज़ोद्दीन उबैद फ़ारुकीचा पहिला रोज़ा



**जलना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील रियाज़ोद्दीन उबैद फ़ारुकी याने रविवारी आपल्या आयुष्यातील पहिला रोज़ा (उपवास) पूर्ण केला. कडक उन्हाळ्यात रियाज़ोद्दीन फ़ारुकीने रोज़ा पूर्ण केल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबद्दल त्याचे मुजाहेद फ़ारुकी, ज़ुबैर फ़ारुकी, माजेद फ़ारुकी, ज़ाकेर फ़ारुकी, राशेद फ़ारुकी, शोएब काझी, आबेद फ़ारुकी आदींनी त्याचे अभिनंदन केले.

# विकासकामांसाठी सर्वांना सोबत घेवून प्रयत्न करणार-खा.बजरंग सोनवणे

## गप्पेवाडी, गौरवाडी, विड्यात विविध विकास कामांचे उद्घाटन

**केज । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात अनेक विकास कामे करणे आवश्यक आहे. अजूनही ग्रामीण भागात चांगल्या सुविधा मिळू शकत नाहीत. येणाऱ्या काळात आपल्याला आवश्यक ती विकास कामे करायची असून त्यासाठी सर्वांना सोबत घेवून विकासकामे करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले. खा.बजरंग सोनवणे यांच्या माध्यमातून केज तालुक्यातल विडा आणि गप्पेवाडी, गौरवाडी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. गप्पेवाडी येथील कार्यक्रमाला माजी आ.पृथ्वीराज साठे, तालुका अध्यक्ष शंकर जाधव, विलास जोगदंड, अर्जुन केदार, अशोक केदार, पांडुरंग केदार, संतोष केदार यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. तर विडा येथील कार्यक्रमाला माजी





आ.पृथ्वीराज साठे, श्रीराम महाराज विडेकर, सुदाम महाराज शास्त्री, संजय महाराज शिरुरकर, तालुका अध्यक्ष शंकर जाधव, सरपंच सुरज पटाईत, उपसरपंच सदाशिव वाघमारे, उधव देशमुख, दिलीप पटाईत, उद्धव पटाईत, बाबासाहेब पटाईत, रणजित, गुट्टे, दत्ता गुट्टे, जानमिया शेख आदी मान्यवर उपस्थित होते. तर गौरवाडी येथील विकास कामांच्या उद्घाटन कार्यक्रमास कार्यकारी अभियंता एम.एम पाटील, उपअभियंता के.बी शेख, बंडू चौधरी, रुपेश बोरगावकर, डॉ.संतोष ढाकणे, तानाजी घाडगे, विनोद घाडगे, महादेव घाडगे, प्रकाश रोमन, आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, या दोन्ही गावातील नागरिकांनी माझ्यावर मोठा विश्वास मतातून दाखविलेला आहे. आज तुमच्याच आशीर्वादाने मी सभागृहात जावू शकलो. तुम्ही तुमची जबाबदारी पुर्ण केली असून आता मी माझी जबाबदारी पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. येणाऱ्या काळात या भागाच्या विकासासाठी मला जे जे करावे लागेल ते मी करेल. ग्रामीण भागात विकास कामे करायला मोठी संधी आहे. याच संधीचे सोने आपण करू आणि विकास कामांसाठी सर्वांना सोबत घेवून कामे करू, असेही ते म्हणाले.

## कारागृह विभागात ५०० कोटींचा घोटाळा

# कारागृहातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमावे- माजी खासदार राजू शेट्टी

**पुणे (वृत्तसंस्था)**– राज्यातील कारागृहामध्ये सन २०२३ ते २०२५ या वर्षांमध्ये रेशन , कँन्टीन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये जवळपास ५०० कोटी रूपयाहून अधिक रक्कमेचा घोटाळा झाला नसल्याचा व माझ्या काळातील खरेदी नसल्याचे स्पष्टीकरण तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी हे धांदात खोटे आहे. अमिताभ गुप्ता हे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२४ या काळात अप्पर पोलिस महासंचालक कारागृह विभाग पुणे येथे कार्यरत होते. अमिताभ गुप्ता यांच्याच काळात कारागृहात अनेक उपकरणांचे खरेदी झाली असून त्यामधील घोटाळ्याची चौकशी पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली. राज्यातील कारागृहातील घोटाळ्याबाबत काल झालेल्या पत्रकार परिषदेनंतर तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता माझ्या काळातील खरेदी झाले नसल्याचे तर पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी शासनाच्या नियमानुसार खरेदी झाले असल्याचा खुलासा केला आहे. दोन्ही अधिका-यांनी सारवासारव केली असून याबाबत सर्व पुराव्यानिशी माहिती काल पत्रकार परिषदेत दिली असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. अमिताभ गुप्ता यांनी त्यांच्या काळात अनेक उपकरणे खरेदी केली आहेत. सदरची खरेदी जीएम वरून करत असताना त्या वस्तूंचा त्यावेळचा बाजारातील दर व कारागृह विभागाने



खरेदी केलेले दरामध्ये मोठी तफावत आहे. उदा, ३० केव्ही जनरेटरची बाजारातील किंमत ५ लाख ४० हजार असताना कारागृहाने ९ लाख ९० हजार रूपयास खरेदी केली आहे. क्ष चे लेसर प्रिंटर ३० हजाराची बाजारात किंमत असून ४९ हजार २२० रूपयांनी खरेदी केली आहे. अमिताभ गुप्ता यांनीच काही मर्जीतल्या ठेकेदारामार्फत खरेदी करता यावा याकरिता २७ मार्च २०२४ रोजी केंद्रीय पध्दतीने निवीदा करण्याची मागणी शासनाकडे मागणी केली होती.यामुळे सदरच्या भ्रष्ट्राचाराची चौकशी सखोल होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याची गरज असून याबाबत पुढील आठवड्यात मुख्यमंत्री , मुख्य सचिव व गृह सचिव यांना भेटून सदरची चौकशी समिती नेमण्याची मागणी करणार आहे.जर खरोखरच कारागृह विभागात भ्रष्ट्राचार झाला नसेल तर दोन्ही अधिकारी जी वेळ देतील तेंव्हा माध्यमांच्यासमोर त्यावेळचे कारागृहाने खरेदी केलेले दर व त्या वस्तुंचे त्याकाळातील बाजारातील दरपत्रक पुन्हा एकदा सादर करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

## महाराष्ट्रात तापमानाचा भडका उडणार?

# पुढील तीन ते चार दिवसांत उष्णता जाणवणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आता देशातील हवामान बदलणार आहे. येत्या दोन दिवसांत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशसह देशातील ९ राज्यांमध्ये उष्णता वेगाने वाढेल. खासगी हवामान एजन्सी स्कायमेटच्या मते, अफगाणिस्तानवर वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय आहे. ते ९ मार्चच्या रात्री जम्मू आणि काश्मीरला पोहोचेल. महाराष्ट्रात उत्तरेऐवजी पूर्वेकडून वारे वाहू लागतील. यामुळे पुढील तीन-चार दिवसांत खूप उष्णता जाणवेल. १०-११ मार्च रोजी मध्य महाराष्ट्रात उष्णतेची लाट येऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



हवामान एजन्सीच्या मते, यानंतरही सलग दोन-तीन पश्चिमी डिस्टर्बन्स निर्माण होतील. त्यांच्यात फरक नसल्याने, उत्तरेकडील वारे वाहू शकणार नाहीत आणि थंडी संपेल. यामुळे १५-१६ मार्चपर्यंत तापमान जास्त राहील. दरम्यान, रात्रीचे तापमानही वाढेल आणि सकाळ आणि रात्रीची थंडी संपेल. पश्चिमी विक्षोभामुळे बहुतेक डोंगराळ भागातील राज्यांवर परिणाम होईल.ज्येष्ठ हवामान तज्ञ डॉ. वेद प्रकाश सिंह म्हणाले की, होळीच्या दिवशी (१३-१४ मार्च) मध्य प्रदेशातील बहुतेक भागात दिवसाचे तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते. तर रात्रीचे तापमान १७-१८ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. १६ किंवा १७ मार्चपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# महिलांना एक खून माफ करा:रोहिणी खडसे यांची राष्ट्रपतींकडे मागणी

## महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांचा दिला दाखला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांमुळे महिलांना एक खून माफ करण्याची मागणी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्याकडे केली आहे.



दरम्यान, रोहिणी खडसे पुढे बोलताना म्हणाल्या की, आपला देश हा महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधींचा देश म्हणून ओळखला जातो. जे शांतीचे अहिंसेचे मोठे प्रतीक आहे. तरी आपली क्षमा मागून वरील मागणी करत आहे. सध्या सगळीकडे याच पत्राची चर्चा सुरू आहे.सर्वात प्रथम आपल्याला जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा ! आपला देश हा महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधींचा देश म्हणून ओळखला जातो. जे शांतीचे अहिंसेचे मोठे प्रतीक आहे तरी आपली क्षमा मागून वरील मागणी करत आहे. कारणही तसेच आहे. आज देशात महिला मोठ्या प्रमाणात असुरक्षित आहेत. येणाऱ्या प्रत्येक दिवशी महिलांवरील अत्याचारांच्या घटनेत वाढ होत आहे. दोनच दिवसांपूर्वी पूर्वी देशाची आर्थिक राजधानी मुंबई येथे एका १२ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आले. राष्ट्रपती महोदया, १२ वर्षीय ! विचार करा काय परिस्थिती असेल? नुकताच वर्ल्ड पॉपुलेशन रिव्यू सर्व्हे आला आहे अशा बातम्या आम्ही वाचल्या. या सर्व्हेमध्ये महिलांसाठी असुरक्षित असलेल्या जगातील विविध देशांचा उल्लेख केला आहे. या सर्व्हे नुसार आशिया खंडात भारत सर्वात असुरक्षित देश असल्याचे म्हटले गेले आहे. महिलांचे अपहरण, महिला बेपत्ता होण्याचे प्रकार, घरगुती हिंसाचार आणि अन्य गंभीर विषयांचाही समावेश आहे त्यामुळे आम्हाला एक खून माफ करा, अशी आम्ही समस्त महिलांच्या वतीने मागणी करतो.

## लाडक्या बहिणींची शासनाकडून फसवणूक

# रत्नागिरी जिल्ह्यातील बहिणींना फक्त एकाच महिन्याचा हप्ता मिळाला

**मुंबई (वृत्तसंस्था)**– 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा फक्त फेब्रुवारी महिन्याचा हप्ता देवून राज्य शासनाने लाडक्या बहिणींची घोर निराशा केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे ४ लाख १७ हजार लाडक्या बहीणी असून त्यातील काहीच बहिणींना फेब्रुवारीचा हप्ता आला आला आहे. इतर बहिणी आजही खात्यात हप्ता येण्याच्या प्रतिक्षेत आहेत. महिला दिनीच शासनाकडून आपली फसवणूक झाल्याने लाडक्या बहिणींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



रत्नागिरी जिल्ह्यातील बहिणींना मागील वर्षातील डिसेंबर व जानेवारीमधील हप्ता हा दोन्ही महिन्यांच्या अखेरच्या आठवड्यात देण्यात आला होता. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याचा हप्ताही अशाच प्रकारे महिनाअखेर जमा होईल अशी आशा होती. मात्र फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा न करता तो शनिवार ८ मार्चला फेब्रुवारी व मार्च अशा दोन्ही महिन्यांचा हप्ता एकत्रित जमा करणार असल्याचे महिला व बाळ कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केले होते. यामुळे संपुर्ण राज्यातील लाडक्या बहिणीसह रत्नागिरी जिल्ह्यातील ४ लाख १७ हजार बहिणी या दोन्ही हप्त्यांच्या प्रतिक्षेत होत्या. मात्र त्यांची ऐन जागतिक महिला दिनाच्याच दिवशी राज्य शासनाकडून फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे रत्नागिरीतील काही बहिणींनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

संपादकीय

# माथ्यावर तळपे ऊन...



राजधानी दिल्ली आणि आसपासचा परिसर सध्या वाढत्या उष्म्याने होरपळतो आहे. सारे लोकजीवन स्तब्ध करणारा इतका तडाखा का बसतो आहे, याचा खोलात जाऊन विचार करायला हवा.
ॲमेझॉन समर सेल आजपासून सुरु, अधिकतर वस्तूंवर होईल मोठी बचत त सूट
एखाद्या भट्टीसारखी तापलेली राजधानी दिल्ली आणि बहुतांश उत्तर भारतात सध्या उन्हाळ्याच्या लाटेची तीव्रता माणसाच्या शरीराला सहन होणार नाही, इतकी आहे. सकाळी सातपासून उन्हाचे चटके बसू लागतात आणि सूर्यास्तानंतरही हवेतील उष्मा व धग कायम राहते. सकाळी दहापासून अनेक रस्ते ओस पडतात. गेला आठवडाभर दिल्लीत बहुतांश ठिकाणी ४५ अंश सेल्सिअस व त्यापुढील तापमानाची नोंद झाली. मागच्या वर्षी उन्हाळ्याची इतकी तीव्र लाट नव्हती. यंदाचा उन्हाळा मात्र दिल्लीकरांची परीक्षाच घेत आहे. दिल्लीतही बिहारप्रमाणे उष्माघाताने प्राण जात आहेत. अर्थात, यंदा अनेक राज्यांत तापमान ५० अंश सेल्सिअस व त्यापेक्षा वर गेले आहे. गेल्या वर्षी वातावरणातील बदलामुळे पृथ्वीवर सरासरी २६ दिवस जास्त उष्णतेची लाट राहिली, असे अभ्यासात दिसले.
भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) म्हणण्यानुसार, राजस्थान आणि हरयाणातून कोरडे आणि उष्ण वारे दिल्लीपर्यंत पोहोचत आहेत; त्यामुळे तापमान चढे आहे. वायव्य भारत, विशेषतः दिल्ली गेल्या एक–दोन आठवड्यांपासून भयंकर उष्णतेने होरपळत आहे. कमाल तापमान सरासरीपेक्षा आठ सेल्सियस अंशांनी जास्त आहे. केवळ लहान मुले व ज्येष्ठच नव्हे, तर तरुणांनाही यंदाचा उन्हाळा तापदायक ठरत आहे. उष्माघाताच्या रुग्णांची संख्या शेकड्यांच्या घरात पोहचली आहे. रुग्णालये रुग्णांनी भरून जात आहेत.
उष्णतेचे बेट बनलेली दिल्ली सर्व बाजूंनी लँडलॉक्ड आहे. दिल्लीच्या चारही बाजूंना सर्व दिशांनी फक्त जमीन आहे. पाकिस्तानची उष्णता, राजस्थानचे वाळवंट आणि हिमालय यांच्या मधला खोलगट भूभाग म्हणजे दिल्ली. साहजिकच या साऱ्या प्रदेशांतील हवामान बदल थेट दिल्लीत पोहोचतात. आयआयटी भुवनेश्वरच्या संशोधनात असे आढळले, की बेबंद शहरीकरणामुळे १४०पेक्षा अधिक शहरे त्यांच्या आसपासच्या निमशहरी, ग्रामीण भागांपेक्षा रात्री ६० टक्के जास्त उष्ण असतात. शहरीकरणाचा सर्वांत मोठा दुष्परिणाम झालेली शहरे म्हणजे अहमदाबाद, जयपूर, राजकोट, दिल्ली–एनसीआर आणि पुणे.
केवळ प्रचंड ऊन आहे असे नव्हे, तर 'लू' म्हणजे चटका देणारा वारा हाही उत्तर भारतातील उन्हाळ्यातला तापदायक प्रकार. माणसाला रेल्वे लागते, विमान लागते तशी उत्तर भारतात 'लू' लागते. आर्द्रता, तापमान, वायूचा दाब हे घटक असणाऱ्या हवामानाचा स्पर्श माणसाला होतो, तो वाऱ्याच्या रूपाने. दिल्लीत राजस्थानकडून उष्ण वाऱ्याचे झोत येतात व ही 'लू' चटका देते. साध्या वाऱ्याची झुळूक असते तशा अतिउष्ण वाऱ्याच्या झळाही लागतात. त्याला 'लू' म्हणतात. पण या 'लू' ला तोंड देण्याचे उपाय आहे. टोपीची कॅप झाली तरी आता ती कोणी घालत नाही. घरातून बाहेर पडताना ग्लासभर ताक किंवा लस्सी पिऊन बाहेर पडावे, हाही एक उपाय; पण तो किती जण करतात?
तज्ज्ञांच्या मते माणूस निसर्गाकडून आपल्या सोयीनुसार वागण्याची अपेक्षा करतो आहे. पाऊस कधी यावा, उन्हाळा कधी असावा, हे माणूसच कसे ठरवतो? राजधानी दिल्ली सातत्याने वाढत आहे. ल्युटियन्स दिल्लीत तगवलेली व जगवलेली हिरवळ सोडली तर दिल्लीभर सगळीकडे काँक्रीटची जंगले अनिर्बंध वाढत आहेत. नियम पायदळी तुडवून सुरू असलेल्या बांधकामांमुळे वातावरणावरही विपरीत परिणाम होत आहे. उष्णतेच्या लाटेचे दुसरे सर्वांत मोठे कारण म्हणजे वातानुकूलन यंत्रांचा (एसी) अतिवापर. त्यामुळे पारा आणखी वर जातो. कूलरही नव्हते तेव्हा लोक घरात पाणी टाकून राहायचे. आता शाळा, शाळांच्या बस, घरे, कार्यालये सारेच एसी झाले आहे. एसीमधून उष्णता बाहेर फेकली जाते. ते घराच्या आतील भाग थंड करतात; पण आसपासचे वातावरण तापवतात.
सन १८७५ मध्ये आयएमडी स्थापन झाली तेव्हा विशिष्ट झोपड्या उभारून, त्यात थर्मामीटर टांगून तापमान नोंदवले जाई. स्टीव्हन्सन्स स्क्रीन नावाचे उपकरण आले. आता अत्याधुनिक तापमान केंद्रांत डिजिटल सेन्सरच्या मदतीने संगणकीय नोंदी ठेवल्या जातात. हे सारे बदल झाले तरीही तापमान मापनात मानवी पैलू दुर्लक्षित आहेच. दिल्लीत सफदरजंग, लोधी रोड व पालम ही मूळची तीनच हवामान मापन केंद्रे. त्यांची संख्या १०वर गेली आहे. यंदा दिल्लीच्या ज्या मुंगेशपूरमधील नोंदीनुसार उष्णतेने ८० वर्षांचा विक्रम मोडला असे मथळे सजले तोच निष्कर्ष आयएमडीने पुढच्या २४ तासांत बदलला. जेव्हा तापमानाच्या नोंदी सरकारी केंद्रांतून त्यांच्या मुख्यालयांच्या आधी वाहिन्यांकडे पोहोचतात तेव्हा अशी गडबड होत असावी. तज्ज्ञ सांगतात, की आकड्यांच्या प्रेमात पडून दिल्ली होरपळली, असे मथळे करताना तापमान मापनाचे निकष काटेकोरपणे पाळले जातात की नाही, हे कोण तपासणार? दिल्लीत ८० वर्षांपूर्वी काय स्थिती होती, त्याची खातरजमा विक्रमी तापमानाच्या बातम्या देणाऱ्या कितीजणांनी करून घेतली असेल, हाही मुद्दा आहेच. अर्थात ती केली तरी सामान्यांच्या हिशेबी सध्या सुरू असलेला अग्निकोप सुरू राहणार आहेच!

# गोष्ट योग्य आहार–विहाराची




वाढ आणि विकासासाठी मुलांच्या पौगंडावस्थेचा काळ हा जलद वाढीचा समजला जातो. त्यात शारीरिक आणि सामाजिक–भावनिक विकासाचाही समावेश होतो. एकूणच, आरोग्य सुधारण्यासाठी या महत्त्वाच्या टप्प्यात पुरेशा पोषणाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.मुला–मुलींच्या पौगंडावस्थेच्या वर्षांमध्ये शारीरिक आणि मानसिक पातळीवर मोठे बदल होत असतात. या वयोगटाला प्रौढत्त्वाच्या दृष्टीने वाढ, विकासाचा टप्पा म्हणता येईल. म्हणजे वयाचा ११ ते १८ हा टप्पा. या काळात भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्या वाढ होतेच; शिवाय स्वतःची नव्याने ओळख होणे, भविष्याची नवी स्वप्ने–आशा असे हे दिवस असतात. किशोरवयीन मुलांची शारीरिकदृष्ट्या योग्य वाढ होईल, यासाठी त्यांना आवश्यक कॅलरी मिळण्यासोबतच आवश्यक अशा पोषकतत्त्वांची गरज योग्यरित्या भागली पाहिजे.
या वयातील पाल्याला योग्य आहाराचे महत्त्व योग्य वयातच सांगितले गेले पाहिजे, तरच त्यांना समतोलित पोषणाचे महत्त्वही कळेल. भारतातील किशोरवयीन मुलींमध्ये किशोरवयीन मुलांपेक्षा चारपट कमी हिमोग्लोबिन असल्यामुळे त्यांच्यात अशक्तपणा आढळतो. या वयात शारीरिक बदल आणि वयात येण्याची प्रक्रिया घडत असते. काखेत केस येणे, आवाज घोगरा होणे आणि उंचीही झपाट्याने वाढत असते. या वयात लैंगिक बदलांची चाहूल लागते, त्यात पोषण व्यवस्थित झाल्यास लैंगिक बदलांचा प्रवास तुलनेने निरोगी राहतो. वाढ आणि विकासासाठी हा जलद वाढीचा काळ आहे आणि त्यात शारीरिक आणि सामाजिक–भावनिक विकासाचाही समावेश होतो. आरोग्य सुधारण्यासाठी या महत्त्वाच्या टप्प्यात पुरेशा पोषणाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.
लहानपणी कुपोषण झाले असेल, तर त्यामुळे बिघडलेली तब्येत सुधारण्यासाठी हीच योग्य वेळ आहे. कुपोषणात झालेल्या चुका सुधारण्यासाठी आयुष्याचे पहिले एक हजार दिवस आवश्यक मानले जातात. तथापि, पौगंडावस्था ही या कमतरता सुधारण्यासाठीच्या संधींची दुसरी पायरी मानली जाते. आहारातील कमतरतेमुळे आयुष्याच्या नंतरच्या वर्षांत एकूणच आरोग्यविषयक धोके निर्माण होऊ शकतात. शारीरिक हालचालींचा अभाव असेल, मैदानी खेळ आणि तत्सम खेळांचा समावेश रोजच्या दिनक्रमात नसेल, तर विशेष लक्ष द्यावे. या वयात चुकीच्या सवयी लागू शकतात. नको ती आकर्षणे समोर येतात. चुकीच्या गोष्टी या मुलांना चांगल्या, भारी आणि उगाचच 'कूल' वाटतात. धूम्रपान आणि इतर चुकीच्या पदार्थांच्या वापरास प्रतिबंध करण्यासाठी वयाचा हा टप्पा महत्त्वाचा आहे.
आहारावर नियंत्रण कुठे आणि कसे?
या वयात मुले 'जंक फूड'कडे आकर्षित होऊ शकतात. 'फास्ट फूड' हे असेही चटक लावणारे असते. आज मुलांकडे पॉकेट मनीमुळे पैसा खेळता असतो. वाढत्या वयामुळे होणारे बदल, नवीन वयाची चाहूल, मित्रांची साथ–सोबत, समोर दिसणारी प्रलोभने यामुळे किशोरवयीन मुलांची मानसिकता बदलते, ज्यामुळे ते त्यांच्या अन्ननिवडीबाबत आणि इतर सवयींचा स्वतंत्र विचार करतात; म्हणून योग्य खाण्यासाठी आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्यासाठी मुलांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. वाढत्या मांसपेशी तयार करण्यासाठी पुरेशी प्रथिने आणि लोह आवश्यक आहे. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन–डी हे हाडांचे पोषण करण्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत, तर ऊर्जा प्रदान करण्यासाठी पुरेसे कार्बोहायड्रेट्स शरीराला आवश्यक आहेत. अन्नातून पोषण हवेच; पण त्याचा अतिरेक नको. वाढत्या वयात शरीरात चरबीचा जलद संचय होतो. लठ्ठपणाला प्रतिबंध करण्यासाठीही निरोगी आणि योग्य प्रमाणात खाणे गरजेचे आहे. तुम्ही किती खाता यापेक्षा काय खाता हे महत्त्वाचे ठरते. पिझ्झापेक्षा फळे बरी, कोल्डड्रिंकपेक्षा उसाचा रस आणि केकपेक्षा लाडू बरा, हे लक्षात घ्यायला हवे.खाणे महत्त्वाचे तसा व्यायामही आवश्यक; कारण सक्रिय खेळांमध्ये भाग घेतल्याने किशोरवयात बळकट स्नायू तयार होतात. खेळल्याने ऊर्जा खर्च होऊन ती जमा होण्यास प्रतिबंध होतो. या वयात 'ग्रोथ हॉर्मोन्स' कार्यरत असतात. व्यायाम आणि खेळामुळे ती उद्दिपीत होऊन मुलांची वाढ व्हायला मदत होते.
अयोग्य खाण्याच्या सवयींचा परिणाम
लठ्ठपणाचा धोका : पौगंडावस्थेच्या सुरुवातीच्या काळात मुलांना भरपूर कॅलरींची आवश्यकता असते; परंतु त्यांना जंक फूड खाऊन या कॅलरी मिळत असतील, तर जास्त वजन वाढणे ही समस्या ठरू शकते. या काळात वाढलेले वजन वय वाढल्यानंतरही लवकर कमी होत नाही. लठ्ठ किशोरवयीन व्यक्ती लठ्ठ प्रौढ होण्याची ८० टक्के शक्यता असते, ज्यामुळे हृदयविकार, मधुमेह आणि झोपेच्या समस्यांचे दीर्घकालीन धोके वाढतात. लठ्ठ किशोरांना जास्त भावनिक अडचणी येतात आणि त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो.शैक्षणिक प्रगती : संशोधनानुसार, अयोग्य आहारामुळे मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि शैक्षणिक प्रगती कमी होते. जी मुले पुरेसे खात नाहीत किंवा जेवण वगळतात त्यांच्या शरीरात कालांतराने कुपोषण होऊ शकते, ज्याचा त्यांच्या शालेय कामगिरीवर परिणाम होतो. जसे की, हिमोग्लोबिन आणि जीवनसत्त्व डी, बी–१२च्या कमतरतेमुळे मुले आळशी, चिडचिडी, हट्टीही होऊ शकतात.सूक्ष्म अन्नद्रव्यांची (मायक्रोन्यूट्रिएंट्स) कमतरता : आहार, ज्यात मुख्यतः प्रक्रिया केलेले, रिफाइंड धान्य आणि चरबी, साखर, कोलेस्टेरॉल आणि सोडियमचे प्रमाण जास्त असेल, तर ते फळे आणि भाज्यांच्या रोजच्या गरजा पूर्ण करत नाहीत. या मुळे लोह, जीवनसत्त्व अ आणि क, मॅग्नेशियम, फोलेट आणि पोटॅशियम यांसारख्या आवश्यक सूक्ष्म पोषकघटकांची कमतरता निर्माण होते. हे घटक रोगप्रतिकारशक्ती, शारीरिक आणि मानसिक वाढीस आवश्यक असतात.ठिसूळ हाडे आणि खुंटलेली वाढ : भारतीय मुलांची उंची आधीपेक्षा कमी झाल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. हाडे आणि दातांसाठी कॅल्शियम, व्हिटॅमिन–डी आवश्यक आहे. या काळात हाडांची जास्तीत जास्त वाढ होते. कॅल्शियमची आवश्यकता पूर्ण न करणाऱ्या किशोरवयीन मुलांमध्ये हाडे ठिसूळ होणे, हाडे तुटणे, हाडांची वाढ खुंटणे आणि ऑस्टिओपोरोसिस होण्याचा धोका अधिक असतो.बालपणातील आरोग्याचे विकार : अतिपोषण, कुपोषण आणि जंक फूडच्या आहारी जाणे या सवयींमुळे शरीरातील आवश्यक पोषकतत्त्वांचे असंतुलन होते. या पौष्टिकतेच्या कमतरतेमुळे पुढे जीवनात विविध प्रकारचे विकार होऊ शकतात; म्हणूनच पौगंडावस्थेत निरोगी आहाराच्या सवयींचा सराव केल्यास निरोगी भविष्याचा पाया तयार होतो.हेही महत्त्वाचे : किशोरवयीन मुले स्वतंत्र होऊ बघत असतात, खाद्यपदार्थांच्या जाहिरातींनी सहज प्रभावित होतात. मात्र, तुम्ही अती शिस्त लावणार असाल आणि तुमचे कडक नियम लागू केले, तर ते बंड करू शकतात. त्या ऐवजी आपल्या किशोरवयीन मुलांशी मैत्रीपूर्ण संभाषण ठेवा, चर्चा करा आणि आहाराबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करा. त्यांना फूड पॅकिंगवरील लेबल वाचण्यास शिकवा. जंकफूड, फास्टफूड आणि सोडा यांच्या नियमित सेवनाशी संबंधित दुष्परिणामांविषयी चर्चा करा. त्यांना त्याचे विपरित परिणाम सांगा, ज्यायोगे ते स्वत:हून असे पदार्थ खाणं टाळतील.

# अन्नपूर्णेची 'डिजिटल' झेप

घरातल्या गृहिणीला आपण साक्षात 'अन्नपूर्णा' म्हणूनच संबोधत असतो; परंतु आता ही अन्नपूर्णा आपल्या कुटुंबापुरतीच मर्यादित न राहता आपल्या पाककौशल्याच्या जोरावर 'फूड ब्लॉगिंग'च्या दुनियेत पंख पसरू पाहतेय. 'डिजिटल'च्या माध्यमातून भारतीय महिला आत्मनिर्भर होत असल्याचे हे आधुनिक आणि 'स्मार्ट' लक्षण म्हणावे लागेल.
काही वर्षांपूर्वी मुलींची लग्न होऊन सून म्हणून त्या नव्या घरात प्रवेश करायच्या; तेव्हा साधारण प्रत्येक मध्यमवर्गीय घरांमध्ये एक गोष्ट हमखास असायची, ती म्हणजे, 'रुचिरा' अर्थात, पाककृतींचे प्रसिद्ध पुस्तक! कमलाबाई ओगले लिखित हे पुस्तक म्हणजे नव्या संसाराला सुरुवात करणाऱ्या मुलींसाठी मोलाचा आधारच जणू! साध्या भात–आमटीपासून ते अगदी पुरणपोळी, कटाची आमटी, मसाले भात, अळूच्या वड्या, सुरळीच्या वड्या, प्रसादाचा शिरा, शेवयाची खीर, चटणी, कोशिंबीर असा अगदी डाव्या–उजव्या बाजूच्या सगळ्या पदार्थांसकट सुग्रास बेत नवख्या गृहिणीलाही लीलया करता यावा व पोटातून जाणारा प्रेमाचा मार्ग सुकर, सुखकर व्हावा याची खात्री देणारा हा पाककृतींचा संग्रह. कालांतराने गुजराती, हिंदी, कन्नड व बंगाली अशा चार प्रादेशिक भाषांमध्ये व इंग्रजीमध्येही अनुवादित होऊन साता समुद्रापार हे पुस्तक लोकप्रिय झाले. किंबहुना, वारसाहक्काने आईकडून मुलीकडे असे पिढ्या न् पिढ्या वापरात येऊ लागले.आज या आपल्या आजीच्या–आईच्या काळातल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्याचे कारण म्हणजे, आजच्या गतिमान जगात नव्याने जन्माला येऊन वेगाने वाढत असलेले 'फूड ब्लॉगिंग' व त्यामधील करिअरच्या संधी! फूड ब्लॉगिंग असो, यू–ट्यूब चॅनेल असो, इन्स्टा रील्स किंवा फेसबुक पेज या सगळ्यांत गृहिणी आघाडीवर असल्याचे चित्र आहे. अगदी कोणत्या पदार्थाची रेसिपी ठरवायची इथपासून ते त्याचे साहित्य जमा करणे, शूटिंगसाठी सजावट, तांत्रिक बाबी सांभाळणे इथपर्यंत त्या सफाईदारपणे सगळी जबाबदारी सांभाळून हजारो फॉलोअर्स आणि भरघोस लाइक्स मिळवत आहेत. यात कॉस्मो सिटी असो, शहरी भाग असो, निमशहरी असो वा ग्रामीण, सगळ्यांच स्तरांतून महिला उत्तम कामगिरी करताना दिसतात. ग्रामीण भागातल्या महिलाही यात मागे नाहीत. विशेष म्हणजे, भारतातल्या सगळ्या प्रादेशिक भागांचे खाद्यचित्र फूड ब्लॉगिंगमध्ये दिसून येते आणि तेही अगदी लज्ज़तदार!माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या आमूलाग्र बदलांमुळे एके काळी पुस्तक स्वरूपात असलेला पाककृतींचा ठेवा आता आपल्या मोबाइलवर एका 'क्लीक वर उपलब्ध आहे. डिजिटल युगात 'वेब ब्लॉग्ज' विविध प्रकारच्या विषयांवर लिहिले जातात. जसे की, खाद्य, प्रवास, आरोग्य, फिटनेस, जीवनशैली, फॅशन, सौंदर्य, फोटोग्राफी, क्रिडा आदी. मात्र, विशेषत्वाने नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे, या सर्वांमध्ये खाद्य विषयांवरील 'फूड ब्लॉग्ज' अधिक लोकप्रिय असून, त्याची संख्या दिवसागणिक वाढते आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यास अहवालानुसार असे लक्षात आले, की प्रमुख ब्लॉगिंग विषयांपैकी फूड ब्लॉगचे मासिक उत्पन्न सर्वाधिक होते. 'फोर्ब्स ॲडवायझर' या नामांकित वृत्तसंस्थेने स्वयंपाकातून आपला आनंद शेअर करायचा असेल, तर 'फूड ब्लॉग' कसा सुरू करायचा या विषयी एक मार्गदर्शक आराखडाही दिला आहे. विशेष नमूद करायची गोष्ट म्हणजे, या अगदी घरबसल्या ऑनलाइन करायच्या सुविधेमुळे अनेक महिला आपले पाककौशल्य घरच्या घरी चित्रित करून यू–ट्यूब, इन्स्टाग्राम, फेसबुक अशा माध्यमांद्वारे जगासमोर मांडून चांगली कमाई करीत आहेत. यातून व्यावसायाच्या संधी त्यांना खुणावत असून, आत्मनिर्भर होण्यासाठी जागतिक स्तरावर व्यासपीठही मिळत आहे.



'फूडी' हा शब्द १९८२ मध्ये न्यूयॉर्क मासिकाच्या फूड समीक्षक गेल ग्रीनने सादर केला होता आणि अन्नामध्ये विशिष्ट स्वारस्य असलेल्या व्यक्तीला ओळखण्यासाठी तो वापरला. बदलत्या काळामुळे आणि तंत्रज्ञानातील गतिमानतेमुळे 'फूडी' हा शब्द आता खाद्यप्रेमींच्या दुसऱ्या श्रेणीसाठी विकसित झाला आहे. व्यावसायिकदृष्ट्या त्याला आता 'फूड ब्लॉगर' म्हणून संबोधले जाते. फूड ब्लॉगर्सना अन्नपदार्थांचे वर्णन करून त्यांच्या प्रेक्षक–वाचकांसोबत ते शेअर करण्यात आनंद होतो. जेवणाच्या अनुभवांचे वर्णन आणि प्रकाशित करण्यासाठी ते त्यांची कल्पनाशक्ती, साहित्यिक सर्जनशीलता वापरतात. फूड ब्लॉगिंग हे खरे तर पत्रकारितेचेच एक अंग आहे आणि ब्लॉगर्स हे पत्रकारांइतकेच प्रभावशाली आहेत. फूड ब्लॉगिंगमध्ये पारंपरिक व अगदी नाविन्यपूर्ण पाककृती लिहिणे, अपलोड करणे; तसेच विविध रेस्तराँमधील खाद्यपदार्थांचे पुनरावलोकन करून लोकांसमोर मांडणे या गोष्टींचा समावेश होतो. या मधील लेखन आणि छायाचित्रण करताना एखाद्या पदार्थामधील काही वैशिष्ट्यपूर्ण बाबींची नोंद घेत असताना त्या पदार्थाच्या सादरीकरणावर व फूड स्टायलिंगवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. हल्ली स्मार्टफोनमुळे घरच्या घरी छायाचित्रण करणे, एखादा पदार्थ बनविताना चलतचित्रण करणे सहज शक्य झाले आहे आणि स्वाभाविकपणे महिला आघाडी या बाबतीतही अग्रक्रम पटकावते आहे.भारतातील पहिल्या फूड ब्लॉगिंगमध्ये तरला दलाल, अर्चना दोशी, मधुरा बाचल अशा अनेकींचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल. भारतातील अग्रमानांकित संजीव कपूर यांचे इन्स्टाग्राम फॉलोअर्स २० लाखांपेक्षा अधिक असून, त्यांचे दूरदर्शनवरील पाककृतींचे अनेक कार्यक्रम आपल्याला माहीत आहेच. आताच्या नव्या पिढीचे फूड ब्लॉगर्स रणवीर ब्रार यांचे १९ लाख इन्स्टाग्राम फॉलोअर्स आणि ५४ लाख यू–ट्यूब सबस्क्रायबर, कविता सिंग यांचे एक कोटी इन्स्टाग्राम फॉलोअर्स आणि १.२६ कोटी यू–ट्यूब सबस्क्रायबर, कुणाल कपूर यांचे १७ लाख इन्स्टाग्राम फॉलोअर्स आणि ४९ लाख यू–ट्यूब सबस्क्रायबर, सारा हुसेन यांचे ५.४ लाख इन्स्टाग्राम फॉलोअर्स आणि १.५१ लाख यू–ट्यूब सबस्क्रायबर आहेत. ही संख्या दिवसागणिक वाढतेच आहे. फूड ब्लॉगिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या काही ब्लॉगिंग वेबसाइट्सही प्रसिद्ध आहेत. 'दसनाज किचन' खास शाकाहारी खवय्यांसाठी, महाराष्ट्रीयन पदार्थांमध्ये 'मधुराज् किचन', नागपूरच्या विदर्भ स्पेशल पाककृतींसाठीचे 'विष्णूजी की रसोई', 'इंडियन सिमर', 'मंजुलाज् किचन', 'निशा मधुलिका' अशी अनेक नावे सध्या लोकप्रिय आहेत. ब्लॉगर आपल्या 'डोमेन'साठी खास नावे निवडतात. 'सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन'द्वारे (एसईओ) आपले संकेतस्थळ अग्रक्रमाने दिसेल यासाठी जास्तीत जास्त फॉलोअर्स मिळवतात आणि सोशल मीडिया त्यांच्या ब्लॉग पोस्टचा प्रचार करताना आढळतात. अगदी आपल्या शेजारच्या काकूही सोसायटीमध्ये त्यांच्या या नव्या उपक्रमाची जाहिरात करताना तुम्ही पाहिले असेल. अगदी उत्साहाने आपल्याशी बोलून 'माझ्या ब्लॉगला लाइक कर, इन्स्टाग्रामवर मला फॉलो कर...' असं त्यांना सांगताना तुम्ही अनुभवले असेल. आधुनिक काळातील खाद्यपदार्थ सोर्सिंग, तयार करणे, सादरीकरण आणि अन्नाचे वर्णन यामध्ये उत्सुकतेने त्यांच्या पाककौशल्याचा छंद त्या जोपासतात. इन्स्टाग्राम, फेसबुक, ट्विटर आणि पिंटरेस्ट फिड्स विविध खाद्य–थीम असलेली चित्रे प्रदर्शित करतात. सध्या खाद्यपदार्थांशी संबंधित 'हॅशटॅग'ची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. 'सीझनल पोस्टिंग' तर जोमाने वाढते आहे.फूड ब्लॉगिंग हे तर आता रेस्तराँ इंडस्ट्रीमध्ये मार्केटिंग आणि प्रमोशनसाठी एक चॅनेल बनले आहे. ब्लॉग लेखक त्यांच्या ब्लॉगद्वारे प्रेक्षकांशी खूप लवकर संवाद साधतात. ते प्रसिद्धीचे माध्यम म्हणून काम करतात. फूड ब्लॉगिंग केवळ खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचीच जाहिरात करत नाही, तर हॉटेलने सादर केलेल्या संपूर्ण जेवणाचा अनुभवही देते. रेस्टॉरंट्स, शेफ, केटरर्स, होम शेफ आणि होम बेकर्स आता त्यांच्या पाककृतींच्या चित्रांवर 'क्लिक' करून आणि शेअर करून विविध सोशल मीडियावर या स्वादिष्ट पदार्थांबद्दल संदेश पसरवून त्यांच्या व्यवसायाचे विपणन करत आहेत. फूड ब्लॉगमध्ये जी कमाई होते ती मुख्यत्वे जाहिरातीतून होतेच; परंतू त्याव्यतिरिक्तही एखादी पाककृती करताना साधनसामग्री काय वापरता, कोणती उपकरणे वापरता त्यावरही या ब्लॉगर्सना कंपन्यांकडून ठरावीक उत्पन्न मिळते. एखादी पाककृती बनवताना वापरलेले जिन्नस, मसाले, लोणची वगैरेची ानलाइन विक्रीसुध्दा करतात. फूड ब्लॉगर्स खाद्यपदार्थांवर आधारित काही शैक्षणिक अभ्यासक्रमदेखील चालवतात. सर्वेक्षणानंतर असे लक्षात आले आहे, की फूड ब्लॉगिंग करण्यासाठीचे मासिक उत्पन्न काहीं लाखांमध्येही असते.स्मार्टफोन, सोशल मीडिया प्रोफाइल आणि ब्लॉगसह सुसज्ज, आधुनिक काळातील खाद्यपदार्थांचा रेस्तराँ व्यावसायाच्या यशावर लक्षणीय प्रभाव पडतो. ही बाब व्यावसायातील नफा वाढविण्यासाठी रेस्तराँ मालक आणि शेफ विचारात घेत आहेत. फूड ब्लॉगिंगच्या आगमनाने, भारतातील रेस्तराँ व्यवसायातील स्पर्धेने उंची गाठली आहे. फूड ब्लॉगिंगमुळे आपल्या खाद्यसंस्कृतीची बाहेर, तर तिथल्या पाककृतींची आपल्याला ओळख होत आहे. अनेक शेफ हे सेलिब्रटी झाले आहेत. डिजिटल क्रांतीने घरातील अन्नपूर्णाही जगभरात पोहोचून आत्मनिर्भर होत आहेत, असे नक्कीच म्हणता येईल.

## महिला दिनानिमित्त महिला पत्रकारांशी मुख्यमंत्र्यांचा संवाद

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**अहिल्यानगर ।प्रतिनिधी**

महिलांच्या सुरक्षेसाठी शासन कडक कायदे करत आहे. कायद्याच्या अंमलबजावणी बरोबरच समाजात महिलांप्रति असलेली मानसिकता देखील बदलणे गरजेचे आहे. महिलांच्या तक्रारींचे तातडीने निरसन करण्यात येत आहे. समाज माध्यमांवर मॉर्फिंग आणि डीपफेक व्हिडिओंच्या माध्यमातून होणारे गैरप्रकार थांबविण्यासाठी सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासन ठोस उपाययोजना करीत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासन कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महिला दिनानिमित्त महिला पत्रकारांसोबत साधलेल्या संवादादरम्यान दिली.

जागतिक महिला दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला पत्रकारांना शुभेच्छा देऊन सह्याद्री अतिथीगृह येथे संवाद साधताना महिलांच्या सशक्तीकरणासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे मांडले. महिलांना विविध क्षेत्रांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणी, त्यांच्या सुरक्षेचे मुद्दे आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठीच्या सरकारी उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. समाजातील मानसिकता बदलण्यासाठी आणि स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. राज्यमंत्री पंकज भोयर सुद्धा यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्र्यांनी माध्यम क्षेत्रातील महिलांसमोरच्या आव्हानांवर भाष्य करताना सांगितले की, महिलांना मल्टीटास्किंग काम करत अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. माध्यम क्षेत्रातील महिलांना तर २४ तास दक्ष राहावे लागते. व्यवसाय, घर आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना प्रत्येक टप्प्यावर अनेक संघर्ष करावे लागतात.महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून विविध क्लस्टर्समध्ये महिला उद्योजकांसाठी खास संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. तसेच, मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने १० हजार महिलांना कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) क्षेत्रात प्रशिक्षित करण्याचे अभियान हाती घेतले आहे.भविष्यातील नोकऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित असतील आणि महिलांनी त्यात आघाडीवर राहावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मॉनिटरिंगचा अर्थ असा आहे की, एक सिस्टम आम्ही उभी करतो ज्याच्यामध्ये सगळ्या ज्या बातम्या



आहेत त्याचे विभागीकरण होणार आहे. त्यातल्या ज्या बातम्या नकारात्मक असतील त्याच जे खरे उत्तर आहे किंवा त्याच्या ज्या फॅक्ट्स आहेत त्या ज्यांनी दिल्या आहेत त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मीडिया मॉनिटरिंगचे प्रयोजन आहे. माध्यमांवरील तो अंकुश अजिबात नाही. प्रशासनात काम करणाऱ्या महिला अधिकारी त्यांच्या जबाबदाऱ्यात चोखपणे पार पाडत असून या कामात त्यांनी त्यांच्या कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे. राज्याच्या मुख्य सचिव पासून प्रशासनातील विविध विभागात मुख्य पदावर महिला अधिकारी आहेत.महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्यातील महामार्गांवर प्रत्येक ५० किमी अंतरावर सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, त्यांचे दीर्घकालीन व्यवस्थापन आणि देखभाल करण्यासाठी ठोस योजना आखण्यात आली आहे.शालेय जीवनापासून जेंडर इक्कलिटी मुलांवर बिंबवली पाहिजे. स्त्रियांचा आदर करणे, सन्मान करणे या बाबी लहान वयातच रुजवल्या पाहिजेत. ही जबाबदारी त्यांची शाळा, परिवार आणि समाजाची देखील आहे.सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या प्रत्येक स्त्रीला तिच्या विचारांना मांडण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. मात्र, सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना सातत्याने ट्रोलिंगचा सामना करावा लागतो, हे दुर्भाग्य आहे. तरीही काही स्त्रिया आपल्या मतांवर ठाम राहतात आणि त्याचा सामना करतात.लव्ह जिहाद प्रकरणावर मुख्यमंत्री म्हणाले की, सुरुवातीला अशा घटना एक-दोन अपवाद म्हणून वाटत होत्या, पण तपासानंतर लक्षात आले की हा मोठ्या प्रमाणावर चाललेला प्रकार आहे. अनेक मुली फसवल्या जात असून, त्यावर कठोर कारवाई आवश्यक आहे. त्यामुळे आम्ही अधिकाऱ्यांची विशेष समिती तयार केली असून त्यांना या प्रकरणांचे सखोल विश्लेषण करण्याचे निर्देश दिले आहेत. अनेकांना माझ्या राजकीय वारसदारांची चिंता असते, पण मी माझ्या घराण्यातला शेवटचा राजकारणी असेन, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक हेमराज बागुल, संचालक किशोर गांगुर्डे आणि संचालक दयानंद कांबळे उपस्थित होते.

# अहिल्यानगर वाचनालयात महिला वाचक सभासद सन्मान सोहळा

**अहिल्यानगर ।प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी ग्रामीण व शहरी भागातही महिला एकत्र येऊन वाळवण, जात्यावरची दळणे ,गाणी म्हणणे, अंगणातील सडा-रांगोळी, सणवार असा एकत्र येऊन संवाद करत असत. त्यातून त्यांचे एक सुदृढ नाते निर्माण होत.शहरी भागात पुढे आर्थिक सक्षमतेसाठी भिशी आली. त्यातून कुटुंबासाठीआर्थिक निधी उभारला जाऊ लागला हे खूप आशादायी बाब होती. सद्यस्थितीत मात्र त्याचे किटी पार्टीत रूपांतर झाले व दिसण्याची राहण्याची एक वेगळी स्पर्धा सुरू झाली. त्यामधून स्त्रीच्या सक्षमतेला ,सुसंवादाला लगाम बसला. सुसंवाद सोडून किटी पार्टी आणि स्टेटस ला महत्त्व आले. खरंतर आपण आहोत तसेच सुंदर मानून मनातील न्यूनगंड काढणे हे खरी गरज आहे. आपण दिसतो कसे यापेक्षा आपली अंतर्बाह्य सुंदरता आपल्याला एक वेगळाच आत्मविश्वास देते. त्याची आज खरी समाजात गरज असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरच्या धर्मदाय उपायुक्त श्रीमती यूएस पाटील( चव्हाण) यांनी व्यक्त केले. महिला दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा वाचलयात महिला वाचक सभासद, कर्मचारी व संचालिका यांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी त्या संवाद साधत होत्या.



वाचनालयाचे अध्यक्ष प्राध्यापक शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष दिलीप पांढरे ,संचालक किरण अग्रवाल ,संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ ,ग्रंथपाल अमोल इथापे, सहा.ग्रंथपाल नितीन भारताल उपस्थित होते.

उपायुक्त श्रीमती पाटील यांनी आपल्या मनोगतात अनेक विषयांना स्पर्श करताना बुद्धीचा विकास हे मानवाचे निरंतर चालणारे ध्येय आहे .माणसाचे वय वाढले किंवा त्याने पुस्तके वाचले तरी त्याला माणसे वाचता आली तर परिपक्वता आली असे म्हणता येईल. स्त्री सातत्याने कुटुंब ,नातेवाईक, मुले ,करिअर, नोकरीयासारख्या अनेक पातळीवर सजगपणे परिपक्व होत असते. मात्र त्यामध्ये तिने स्वतःकडे पाहण्याचा सजगदृष्टीकोन विसरता कामा नये. कुटुंबासाठी पौष्टिक आहार, व्यायाम, हेल्थ पॉलिसी, घरातील सुसंवाद व समाधान मानण्याची वृत्ती या गोष्टीचा आग्रह व कृती महिलांनी केली तर कुटुंब व समाज सुदृढ होईल असा आशावाद व्यक्त केला.प्रास्ताविकात वाचनाचे अध्यक्ष प्राध्यापक शिरीष मोडक यांनी ऐतिहासिक जिल्हा वाचनालयाने द्वि शतकाकडे वाटचाल करताना अनेक चढ-उतार ,घटना परिवर्तने पाहिली व ते संदर्भ जतन करून ठेवले आहेत. देशात सर्वच पातळीवर स्त्रीने स्वतःचे कर्तृत्व व अस्तित्व सिद्ध केले असताना आजचा होणारा कार्यक्रम स्त्रीशक्ती व त्यांची प्रतिभा यांची उंची वाढवणारा ठरेल असा आशावाद व्यक्त केला . याप्रसंगी धर्मदाय उपायुक्त श्रीमती एस पाटील यांचा सन्मान अध्यक्ष प्राध्यापक शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी केला. श्रीमती पाटील यांच्या हस्ते कर्तृत्वान महिला सदस्य पद्मजात धोपाकर ,शिल्पा रसाळ ,संजीवनी बर्डे ,प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी ,पल्लवी कुक्कडवाल ,वर्षा जोशी सारिका देव पौर्णिमा गायकवाड साक्षी पद्मा ,दिपाली कल्याणम ,मंगल कदम, कांचन हेंद्रे ,शारदा परदेशी, लीना घोगरे, विद्या मुनोत,प्रीतम कटारिया, वैशाली पटवा ,अनुष्का व तनिष्का ठाकूर, अश्विनी घुगरे ,सौ शहा यांचा पुस्तके शाल ,श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक व परिचय प्राध्यापक ज्योती कुलकर्णी स्वागत कार्यवाह विक्रम राठोड तर आभार शिल्पा रसाळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय गाडेकर संकेत पाठक ,निखिल ढाकणे, बाबा सिकंदर यांचे सहकार्य लाभले.

# निमगाव वाघात गाव आणि कुटुंब कारभारीणींचा सन्मान



**अहिल्यानगर ।प्रतिनिधी**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने गाव आणि कुटुंब कारभारीण महिलांचा सन्मान करण्यात आला. महिला दिनानिमित्त हा सन्मान सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाप्रसंगी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटीचे संचालक अतुल फलके, ग्रामपंचायत अधिकारी गोवर्धन राठोड, उपसरपंच किरण जाधव, दीपक जाधव, नवनाथ फलके, संदीप गायकवाड, प्रकाश गायकवाड, विजय गायकवाड, छोटू शेख, हुसेन शेख, पोपट फलके, बाबा शिंदे, प्रकाश फलके, मच्छिंद्र काळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी महिला सरपंच लता फलके आणि पंतप्रधान आवास योजनेत घरकुल मंजुर झालेल्या महिला लाभार्थी भिमाबाई डोंगरे, शितल इधाटे, लता फलके, जिजाबाई जाधव, रईसा पठाण, अर्चना काळे, कविता काळे, भारती गायकवाड, बाई जाधव यांचा सत्कार करण्यात आला. अतुल फलके म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीन प्रगतीसाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे. गावाच्या आणि कुटुंबाच्या विकासासाठी महिला वर्ग योगदान देऊन, समाज घडविण्यापासून ते संस्कार रुजविण्यापर्यंत महिला कार्य करत आहे. अनेक क्षेत्रात महिला यशोशिखरावर आहेत. प्रत्येक पुरुषाच्या यशामागे एक महिला असते. चुल आणि मूलच्या पलीकडे जावून वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंच लता फलके यांनी गावात महिलांचा सन्मान केल्याबद्दल फाऊंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक करुन ग्रामपंचायतच्या वतीने आभार मानले.

# नवगण राजुरी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नवगण राजुरी (प्रतिनिधी):** येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त वै.रामबाबा सोनवणे खांबेकर यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सप्ताहाची सुरूवात रविवार दि.९ मार्च रोजी होत आहे.

या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० गाथा पारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी २ ते ४ संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचण, ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होणार असुन यात ह.भ.प.नामदेव महाराज बहीर, ह.भ.प.रामानंद महाराज पुरी, ह.भ.प.दिपक महाराज जोशी, ह.भ.प.प्रविण महाराज खांडे, ह.भ.प.रावसाहेब महाराज शेळके, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज चव्हाण, ह.भ.प.अशोक महाराज झुनगुरे यांचे प्रवचन तर ह.भ.प.गुरूवर्य महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड, ह.भ.म.प्रमिलाताई महाराज ढेंगळे, ह.भ.प.विठ्ठल महाराज बहीर, ह.भ.प.युवा किर्तनकार अक्षय महाराज पिंगळे, ह.भ.प.हरी महाराज गवते, ह.भ.प.महंत रामानंद महाराज भारती, ह.भ.प.महंत रामेश्वर महाराज शास्त्री यांचे हरिकिर्तन होईल. या सप्ताहाची सांगता रविवार दि.१६ मार्च २०२५ रोजी सकाळी भव्य दिव्य नगर प्रदर्शनाने निघेल. त्यानंतर १० ते १२ ह.भ.प.आचार्य आमृताश्रम स्वामी महाराज यांचे संत तुकाराम महाराज वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त बिजेचे व काल्याच्या किर्तनाने होईल. तरी या सप्ताहाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी नवगण राजुरी यांनी केले आहे.

# आ.विजयराजे पंडित यांचा मंत्रिमंडळात समावेश करा-समर्थ सेनेची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी):** मागील अनेक वर्षांपासून मराठवाडा व बीड जिल्ह्य विकासापासून मागासलेला आहे ऊसतोड कामगारांचा बीड जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखला जातो या जिल्ह्याच्या विकासासाठी गेवराई विधानसभेचे आमदार विजयराजे पंडित या तरुण व खंबीर अशा युवक नेतृत्वाची मंत्रिमंडळात गरज असून आमदार विजयराजे पंडित यांनाच मंत्रिमंडळात संधी द्यावी अशी मागणी समर्थ सेनेचे संस्थापक अध्यक्ष महेश कुलकर्णी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत गेवराई विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार विजयसिंह पंडित हे तरुण युवक आमदार आहेत त्यांना सर्वसामान्य जनता व युवकांच्या प्रश्नाची जाणीव आहे तसेच बीड जिल्ह्यातील विकासाचे अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांनी बीड जिल्हा परिषद चे अध्यक्ष असताना सोडवलेले आहेत बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना बीड जिल्ह्यातील खेडे पाडे वाडे वस्ती पांडे आदी भागात मोठी विकासाची कामे केली आहेत विविध शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केलेले आहे सर्वसामान्य जनतेचा तसेच शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात विजयसिंह पंडितांना मानणारा वर्ग आहे व जिल्ह्यातील तरुण युवक ही त्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभा आहे सर्व जाती धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व म्हणून विजयसिंह पंडित यांची ख्याती आहे गेवराई विधानसभे चे आमदार या नात्याने ते संपूर्ण जिल्हाभरातील लोकांची संपर्क ठेवून आहेत विकास कामाच्या बाबतीत एक अनुभवी नेतृत्व म्हणून विजयसिंह पंडित यांच्याकडे पाहिले जाते माजी उपमुख्यमंत्री शिवाजीराव दादा पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई विधानसभेत आमदार झाल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी सर्वसामान्य जनतेच्या व मतदार बांधवांच्या प्रत्यक्षात गाठीभेटी घेऊन विकास कामांना नाही मोठे बळ देण्याचा प्रयत्न केला आहे विजयसिंह पंडित हे गेवराई विधानसभेचे जरी आमदार असले तरी बीड जिल्ह्यातून इतरत्र मतदार संघातून अनेक लोक त्यांच्याकडे कामानिमित्त जातात व ते सर्वांचीच कामे लक्षपूर्वक करतात अडचणीतल्या माणसाला न्याय देण्याचे कार्य ते सातत्याने करतात यामुळे सर्व क्षेत्रातील काम करणारे लोक विजयसिंह पंडितांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत याची दखल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व पक्षश्रेष्ठींनी घेऊन आमदार विजयसिंह पंडित हे सक्षम आमदार आहेत यांना महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी समर्थ सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा आदर्श पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष महेश कुलकर्णी यांनी केली आहे

# मी पणा सोडून मानवांनी संताचे विचाराने आचरण करावे-ह.भ.प.विठ्ठल महाराज

**डोंगरकिन्ही (प्रतिनिधी):** मानवी जीवनामध्ये संतांचे खुप मोठे योगदान आहे. हे त्यांनी आपल्या आचरणातून, अभंगातून जगाला जगण्याचा मार्ग दाखवला आहे. मृत्यू लोकी जन्म घेतलेल्या परमात्म्याला नियम पाळावे लागले सामान्य जीवन जगावे लागले. आपण तर साधी माणसं आहोत कसला मी पणाचा अहंकार करता मी पणा सोडून संत सेवा करा ,सत्य आचरण करा , परमार्थ करा ,आपले जीवनाचे सार्थक करा असा उपदेश मठाधिपती महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर यांनी डोंगरकिन्ही येथे अखंड हरिनाम सप्ताह समाप्ती काल्याच्या किर्तना प्रसंगी समस्त हजारो भाविकांना केला.

इवलेसे रोप लवियेलें द्वारी ।त्याचा वेलू गेला गगणावरी । या अभंगाप्रमाणे डोंगरकिन्ही येथे भाऊंचे मंदीर व्हावे या छंदामधून युवकांनी भाऊंच्या जीवनावरील नाट्य प्रयोग सादर करून, ग्रामस्थांच्या अर्थिक देणगी मधून वामनभाऊ मंदिराची स्थापना केली.येथील संत वामन भाऊ मंदिरामुळे ,सर्वांच्या योगदानामुळेच आज डोंगरकिनी परिसराला खूप मोठे वैभव प्राप्त झाले आहे हे वैभव एकविचाने वाढवणे व टिकवणे हे महत्त्वाचे असल्याचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांनी मत व्यक्त केले. प्रतिवर्षी प्रमाणे डोंगरकिन्ही येथे संत



वामनभाऊ महाराज मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने संत वामनभाऊ यांच्या कृपा आशिर्वादाने , मठाधिपती विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २७ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. सप्ताह दरम्यान सकाळी नाष्टा, दुपारी व रात्री जेवन अशी अन्नदानाची सोय करण्यात आली होती. दुपारी दोन ते भावार्थ रामकथा ठेवण्यात आली होती. सात दिवस वेगवेगळे नामवंत महाराजांचे हरीकिर्तने ९ते ११ वेळेत संपन्न झाले. दि.६ मार्च रोजी झाली सकाळी ८ ला पालखीची भव्य नगर प्रदक्षिणा करण्यात आली.गावातील महिलांनी ठिकठिकाणी रस्त्यावर सडा,रांगोळीने सजावट केली होती. कीर्तन सप्ताह समाप्ती मोठ्या उत्साहात हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाप्रसादाने संपन्न झाली.

# वाढीव टप्पा निधीची अर्थसंकल्पात तरतूद करा-बीड जिल्हा विनाअनुदानित कृती समिती

## मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १४ ऑक्टोबरच्या निर्णयाची अंमलबजावणी करून टप्पा वाढीसाठी निधी मंजूर करा अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

१४ ऑक्टोंबरच्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा संघटनेच्या वतीने गेली पाच महिन्यांपासून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारने मात्र विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या टप्पा वाढ अनुदानाची मागणी गांभीर्याने न घेता सातत्याने दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सर्व राज्यातील विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनी संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यात जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनासाठी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली परंतु पोलिसांनी बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जेलभरो आंदोलनासाठी परवानगी नाकारली. पोलिसांनी जेलभरो आंदोलनाला परवानगी नाकारल्या नंतर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असलेल्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शांततेच्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांच्या संदर्भातल्या शासनाला निवेदन सादर करण्याची पोलिसांनी विनंती केली. पोलिसांच्या या विनंतीला मान देऊन मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव यांच्या सह जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वनाथ मुंडे आणि महेंद्र वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर बीड जिल्हा शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान बीड जिल्ह्यासह राज्यातील सर्व विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडे लक्ष लागले आहे.



# सरस्वती विद्यामंदिरात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

**बीड( प्रतिनिधी):** येथिल शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिरात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला.सदरील कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.अंकुश गोरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेचे सत्र विभाग प्रमुख श्री.गहीले सर व श्रीम.सांगळे मॅडम ऊपस्थीत होते.सदरील कार्यक्रमाप्रसंगी प्रशालेतील सर्व विद्यार्थीनी प्रतिनीधी तसेच माता पालक व प्रशालेतील महिला शिक्षिकांना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या तसेच सत्र विभाग प्रमुख श्री.गहिले सर यांच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त प्रशालेतील गरीब व होतकरू मुलींना



शैक्षणिक साहित्य वितरण करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथींनी महिला दिनाचे महत्व पटवून देत महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. दिल्या .सदरील कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक सचिव तथा जेष्ठ शिक्षक नेते सन्माननीय उत्तमराव पवार साहेब यांनी सर्व विद्यार्थीनी , शिक्षिका व माता पालकांना आपल्या लेखी संदेशाद्वारे महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठे विभाग प्रमुख श्रीम.तुपारे मॅडम व श्रीम.राऊतमारे मॅडम आदिंचे सहकार्य लाभले.

# पवनचक्की कंपन्यांना सरकारचे अभय दडपशाहीमुळे शेतकऱ्यांना वाली कोण?

**बीड( प्रतिनिधी):** पवनचक्की कंपन्यांना काही समाजकंटकांकडुन त्रास दिला जात असल्याची तक्रार ४६ पवनऊर्जा कंपन्यांची संघटना असलेल्या विपा ने केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना केली आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी बीड यांना पत्र पाठवून कंपन्यांना त्रास देणारांचा बंदोबस्त करावा असे लेखी आदेश दिले आहेत. पवनचक्की कंपन्यांना त्रास देणारे, खंडणीखोर यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी मकोका अंतर्गत कारवाई व्हायला हवी याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याचे स्वागतच आहे मात्र याचवेळी बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक, दडपशाही, शासनाची दिशाभूल



करणे,पोलिस प्रशासनाच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करणे आदी घटना घडत असताना या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समितीचे स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांचे निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे.

# डिजिटल मीडिया परिषद पाटोदा तालुका कार्यकारिणीचा सत्कार समारंभ संपन्न

**पाटोदा (प्रतिनिधी):** दि ७/३/२५रोजी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.एस.एम.देशमुख सर यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिलजी वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली,

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी खालील प्रमाणे डिजिटल मीडिया परिषद पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर केली आहे. पाटोदा अध्यक्ष :- गोकुळ इंगोले कार्याध्यक्ष :- हरिदास शेलार उपाध्यक्ष :- प्रदिप उबाळे सचिव :- नितीन भोंडवे यांची निवड करण्यात आली याबद्दल निवडीबद्दल मराठी पत्रकार परिषद पाटोदा यांच्या वतीने सत्कार समारंभ घेण्यात आला. या सत्कार समारंभाला प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ पत्रकार व मार्गदर्शक



हमिदखान पठाण शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस विष्णुपंत घोलप, मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष अजय जोशी, ज्येष्ठ पत्रकार कादर मकरानी, आदर्श पत्रकार जावेद शेख, कॉम्रेड भगवान जावळे, भंतेजी धम्मानंद जावळे, विष्णुपंत गाडेकर सह नूतन कार्यकारिणी मधील तालुकाध्यक्ष गोकुळ इंगोले ,उपाध्यक्ष प्रदिप उबाळे ,कार्याध्यक्ष डॉ. हरिदास शेलार सचिव नितीन भोंडवे आदी पत्रकार व पदाधिकारी उपस्थित होते.

# मुद्देश वाडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**गंगापूर । प्रतिनिधी**

मुद्देश वाडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त गावातील कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका, आरोग्य सेविका यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

महिला दिनानिमित्त गावातील चिमुकल्यांनी विविध कर्तबगार महिलांच्या वेशभूषेचे साकार करून उत्साहात सहभाग घेतला.कार्यक्रमाला लोकनियुक्त सरपंच योगेश तारु, उपसरपंच भागवत दारुंटे, ग्रामपंचायत सदस्य भारती दारुंटे, मुक्ताबाई गादेकर, ग्रामपंचायत कर्मचारी आशाबाई पठाण, शिक्षक कबाडे, साळुंखे , वावरे, तोडमाल , व्हाईस चेअरमन इनुस भाई शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### महाजनवाडी गावातील शेतकऱ्यांचे

# सोयाबीन आणि कडबा शार्क सर्किटने जळाले अंदाजे लाखांचे नुकसान-डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश (प्रतिनिधी):** बीड तालुक्यातील मौजे महाजनवाडी येथे आज दि.७ सोमवार रोजी दुपारी २ वाजता शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे येथील गट नंबर २१७ मधील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण घरत यांचे १५ क्विंटल सोयाबीन आणि २०० ज्वारीचा कडबा असे एकुण ६५ हजार रूपयांचे नुकसान



झाले तर लगतच्या गट नंबर २१६ मधील शेतकरी राणुबाई रामचंद्र शिंदे यांच्या शेतातील सोयाबीन १० क्विंटल अंदाजे किंमत ४० हजार रुपये शार्ट सर्किटमुळे जळाले. महावितरणच्या गलधान कारभारामुळे हि आग लागुन नुकसान झाल्याने आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फोनवरून तहसीलदार चंद्रकांत शेळके,महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे आणि नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना फोन वरून कल्पना दिली असुन पंचनामा करण्यासाठी कर्मचारी पाठवतो म्हणाले.

# शिरूर मधील सर्व शेतरस्ते महसुल अभिलेखात नोंद होणार-श्री.घोळवे

## शिवराम राऊत यांच्या अनेक वर्षांच्या मागणीला यश

**शिरूर (प्रतिनिधी):** शिरूर तालुक्यातील शेतक-यांना सुस्थितीत शेतरस्ते नसणे हि प्रमुख समस्या विचारात घेता.शिवराम राऊत यांच्याकडून अनेक वर्षापासुन या बाबतीत संघर्ष व पाठपुरावा चालू असतो.सद्यस्थितीत वापरातील, शेतरस्ते, पायवाट, गाडीरस्ते, नंबरबांधरस्ते ,सर्वे नं. रस्ते, वस्ती जोड रस्ते, शीव रस्ते, हे वापरात अनेक वर्षापासुन असतात परंतू त्यांची शासनाच्या महसुल अथवा भूमी अभिलेख मधील प्रमाणित नकाशात नोंदच नसल्याने अनेक समस्या निर्माण होतात.यामधील प्रमाणित दस्तावेज नसल्याने या रस्त्याचे मजबुतीकरण,पांदन रस्ते योजना, खडीकरण, मजबुतीकरण,व विविध योजनेच्या लाभ देता येत नाही.तसेच काही खोडकर शेतकरी रस्ता आडवणे, अतिक्रमण करणे,बांधरेटणे, रस्ते विकास कामात संमती न देणे, यामुळे शेती वहिवाटीस अडथळा निर्माण होऊन शेतक-यांतील संघर्ष विकोपाला जातो. काहि राजकिय हेवेदावे, जूण्या भांडणाच्या कुरापती मधून शेतक-यांना वहिवाटीस व येण्या- जाण्यास मज्जाव करणे यामुळे महसुली प्रशासनाने किमान हिवरसिंगा सज्जा अंतर्गत सद्यस्थितीत वापरातील सर्व प्रकारच्या रस्ते प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्यांचा पंचनामा करून त्या-त्या गट नं.,सर्वे नं.च्या इतर हक्कात सदरील रस्ता प्रकार,त्यांची लांबी-रुंदी यांच्या नोंदी घ्यावी व भूमी अभिलेख कार्यालयातील गाव नकाशात प्रमाणित करण्यासाठी सहकार्य करावे यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने अध्यक्ष शिवराम राऊत,उपाध्यक्ष श्री.माऊली शिंदे.यांनी शिरूर तालुक्याचे तहसिलदार श्री.घोळवे यांची भेट घेऊन या विषयी मागणी करताच.संबधित यंत्रणेला सुचित करत पूर्ण तालुक्यातील मंडळाधिकारी,तलाठी व गाव रस्ता समितीच्या माध्यमातुन प्रचलित वहिवाटीत असणारे सद्यस्थितीला रस्ते पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.लवकरच या संबंधी कार्यवाही पुर्ण करून हिवरसिंगा सह तालुक्यातील प्रत्येक सज्जातील रस्ते नोंद करण्याचे तहसिलदार घोळवे यांनी अश्वासित केले..

### शासनाचे आदेश असूनही प्रशासकीय यंत्रणा

# अवैध धंद्यावर कारवाई का करत नाही?-वसंत मुंडे

**परळी (प्रतिनिधी):** बीड जिल्ह्यात प्रशासकीय यंत्रणा लोकप्रतिनिधी राजकीय नेते सहकार्य असल्यामुळे अवैध धंद्यावर कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. बीड जिल्हा महाराष्ट्र मध्ये कष्टाळु जिल्हा म्हणून ओळख आहे. त्यात ऊसतोड कामगार, शिक्षण क्षेत्रात,पोलीस यंत्रणा, मिल्ट्री मध्ये , शासकीय सेवेत मोठ्या प्रमाणात जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे.



लोकप्रतिनिधी, राजकीय नेते प्रशासकीय यंत्रणा बीड जिल्ह्यामध्ये अवैद्य नियमबाह्य मटका बुक्की आफु चरस गांजा नियम बाह्यय वीट भट्ट्या अवैध वाळू मुरूम माती थर्मल मधील कोळशाची राख, प्राणी व जनावराची मांस पत्त्यांची बुकिंग संदर्भातील अवैध धंदे मुळे खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहाराची संपूर्ण उलाढाल जिल्ह्यात होते. अवैध धंद्यामुळे पूर्ण जिल्ह्यामध्ये खून दरोडे चोऱ्या लुटमार मुली स्त्रियावर अत्याचार युवा पिढी गांजा अफू चरसच्या आहारी गेल्यामुळे जीवन उध्वस्त झाले. संपूर्ण जिल्ह्यातील बाजारपेठेवर शिक्षण क्षेत्रात घातक परिणाम झालेले असून जिल्ह्याचे संपूर्ण नाव बदनाम झाले आहे.जिल्ह्यामध्ये सहकारी बँक वेगवेगळ्या मल्टी पतसंस्था मध्ये खूप मोठ्या प्रमाणावर गैर व्यवहार राजकीय नेत्याच्या सहकार्याने केला आहे. मटन खानावळी हॉटेल विनापरवाना सर्वच ठिकाणी अवैद्य मध विक्री होत असून राजकीय नेते लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य असल्यामुळे अवैध धंद्यावर कारवाई केली जात नाही. जे कर्मचारी प्रशासकीय अधिकारी अवैद्य धंद्यांना सहकार्य करतात त्यांच्या तात्काळ बदल्या बीड जिल्ह्याबाहेर करण्यात याव्यात अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077